# २० व्या शतकातील महाराष्ट्रातील समाजसुधारक
# घटक १ : प्रारंभिक सुधारक
# २) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे

**प्रास्ताविक**

जुन्या अनिष्ट परंपरांचे जोखड फेकून नवसमाज निर्माण करणारे आणि शोषितांच्या अंधकारमय जीवनात प्रकाश पसरवणारे थोर समाजसुधारक महर्षी विठ्ठल रामजी शिंदे होय. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला महाराष्ट्राच्या सामाजिक पटलावर ज्या महापुरुषांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला, त्यामध्ये महर्षी शिंदे यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. 'बहुजन हिताय,बहुजन सुखाय हे ब्रीदवाक्य केवळ शब्दांत न ठेवता त्यांनी ते प्रत्यक्षात जगून दाखवले. 'अस्पृश्यता निवारण' हे त्यांच्या जीवनाचे मुख्य ध्येय होते. यासाठी त्यांनी 'डिप्रेस्ड क्लास मिशन' ची स्थापना करून दलित वंचितांच्या शिक्षणासाठी आणि प्रगतीसाठी पाया रचला. केवळ धार्मिक सुधारणाच नव्हे, तर शेतकरी, कष्टकरी, आणि महिलांच्या प्रश्नांवरही त्यांनी मोलाचे कार्य केले आहे.

**जन्म व कौटुंबिक पार्श्वभूमी व शिक्षण**

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा जन्म कर्नाटकातील जमखिंडी येथे २३ एप्रिल १८७३ रोजी झाला. वडिलांचे नाव रामजी व आईचे नाव यमुनाबाई होते. ते दोघेही कानडी भाषिक होते. घरची परिस्थिती गरिबीची होती. शिंदे यांचे वडील वारकरी पंथाचे होते. त्यांच्या घरी संत ज्ञानेश्वर, तुकाराम व माहिपतीबुवा यांच्या ग्रंथांचे व अभंगांचे नित्य वाचन होत असे. वयाच्या नवव्या वर्षी त्यांचा विवाह रुक्मिणी बाई यांच्याशी झाला. शिंदे यांचे प्राथमिक शिक्षण जमखिंडी येथेच झाले. १८९१ साली ते मॅट्रिक झाले. मॅट्रिक झाल्यावर त्यांना तेथेच नोकरी मिळाली परंतु पुढील शिक्षण घ्यायचे असल्यामुळे त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला. गंगाराम भाऊ म्हस्के यांच्या मदतीने त्यांनी पुणे येथे फर्ग्युसन महाविदयालयात प्रवेश घेतला व बीए झाले. बडोद्या-च्या सयाजीराव गायकवाड यांनी महर्षी शिंदे यांना शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य केले. पुढे एल. एल. बीच्या शिक्षणासाठी ते मुंबईला गेले. नंतर डॉ. भांडारकरांच्या प्रयत्नांमुळे विठ्ठल शिंदे १९०१ ते १९०३ या काळात शिक्षणासाठी इंग्लंडला गेले. तेथे त्यांनी विविध धर्मांचा अभ्यास केला. यासाठी त्यांना अमेरिकन युनेटेरियन असोसिएशनची शिष्यवृत्ती मिळाली होती. भारतात आल्यानंतर १९०३ साली सयाजीराव गायकवाड यांनी त्यांना दिवाणपद देऊ केले. पण त्यांनी ते नाकारले आणि समाजसुधारणा व अस्पृश्यता निवारणासाठी स्वतःला वाहून घेतले

**वि. रा. शिंदे यांच्यावरील प्रभाव**

कुटुंब वारकरी पंथांचे असल्यामुळे त्यांच्यावर वारकरी संप्रदायाचा तसेच त्र्यंबकराव खांडेकर या शिक्षकाचा प्रभाव होता. त्याचबरोबर त्यांचा अनेक ग्रंथांचा सखोल अभ्यास असल्या-मुळे जे. एस. मिल (यांचे ग्रंथ लिबर्टी व सब्जेक्ट ऑफ वुमेन), हर्बर्ट स्पेन्सर (यांचे एज्युकेशन व सोशॉलॉजी हे ग्रंथ) व मॅक्समुलर च्या धार्मिक विचारांचा प्रभाव त्यांच्यावर होता, आगरकर, रानडे, भांडारकर यांच्या लेखनाचाही त्यांच्यावर प्रभाव होता. या विचारां-च्या प्रभावामुळेच विठ्ठल रामजी शिंदे यांच्या मनामध्ये समाज- सुधारणेविषयीची जाणीव निर्माण झाली.

**महर्षी शिंदे यांचे लेखन**

महर्षी शिंदे यांनी आपल्या विचारांचा प्रसार व्हावा यासाठी महत्त्वपूर्ण लेखन केले 'माझ्या आठवणी व अनुभव' हे त्यांचे आत्मचरित्र आहे. तसेच 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' हा त्यांचा महत्वाचा ग्रंथ आहे. यातूनच त्यांनी अस्पृश्यांच्या प्रश्नांची मांडणी केली. 'भागवत धर्माचा विकास व मराठ्यांची पूर्वपीठिका', 'कानडी मराठी संबंध', 'कोकणी मराठी संबंध' इ. त्यांचे प्रसिद्ध लेख आहेत. सुबोध पत्रिकेसाठी ते लेखन करीत असत. त्यांनी केलेल्या लिखाणामुळे समाजजागृती व सुधारणा होण्यास भरपूर मदत झाली.

१९१९ मध्ये वंचित घटकांना राजकीय प्रतिनिधित्व मिळावे यासाठी साउथबरो फँचायझी कमिटीसमोर साक्ष दिली. राजकीय चळवळीतही त्यांचा सहभाग होता. सविनय कायदेभंग चळवळीत त्यांनी कारावासही भोगला. महर्षी शिंदे यांचे कार्य सर्वांगीण व व्यापक होते त्यांच्या सुधारणा कार्याचा आढावा पुढीलप्रमाणे...

**महर्षी. वि. रा. शिंदे यांचे समाजसुधारणाविषयक कार्य**

**प्रार्थना समाजाचे कार्य**

लोकांनी चुकीच्या पद्धतीने धर्माचे आचरण करू नये, शुद्ध भावनेने ईश्वराची प्रार्थना करावी अशी शिकवण देणाऱ्या प्रार्थना समाजाविषयी त्यांना प्रचंड आदर होता. या समाजाचे तत्वज्ञान लोकांपर्यंत पोहचविण्याचे कार्य त्यांनी सुरू केले. प्रार्थना समाजाचे ते एकनिष्ठ सेवक बनले. प्रार्थना समाजाचे प्रचारक म्हणून त्यांनी कर्नाटक, बंगाल, बिहार व मद्रास या प्रांतांत प्रवास केला. त्यांची भाषणे प्रार्थना समाजाच्या कार्याला प्रेरक ठरली. प्रार्थना समाजाचे प्रसारक म्हणून सातारा जिल्हयातही त्यांनी महत्त्वपूर्ण कार्य केले. १९१० पर्यंत त्यांनी प्रार्थना समाजात कार्य केले व पुढे ते ब्रम्हदेशामध्ये ही प्रचारार्थ गेले

**अस्पृश्यता निवारणाचे कार्य**

सामाजिक विषमता नष्ट होण्यासाठी व अस्पृश्यांच्या प्रगतीसाठी महर्षी विठ्ठल शिंदे यांनी आतोनात प्रयत्न केले. त्यांना अस्पृश्य समाजाची दयनीय अवस्था पहावत नव्हती. त्यासाठी त्यांनी अस्पृश्यता निवारण परिषदांचे आयोजन केले. आणि या परिषदांमध्ये 'अस्पृश्यांसाठी आस्पृश्यता निवारणाचा ठराव' मांडला. १९१७ मध्ये काँग्रेसने अस्पृश्यतेविरुद्ध ठराव मंजूर केला त्यातही शिंदे यांची भूमिका महत्त्वाची होती. १९३२ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली. तेव्हा अस्पृश्यांनी भारतीय समाजाच्या मुख्य प्रवाहापासून वेगळे पडू नये म्हणून त्यांनी या मागणीला विरोध केला. 'मांग' या दलित जातीच्या समाजाची सुधारणा व्हावी व त्यांचे दारिद्रय दूर व्हावे यासाठी त्यांनी इंग्रज सरकारपुढे 'मांग वसाहत संकल्पना' सादर केली. अस्पृश्य समाजाला अपमानित जीवनातून बाहेर काढण्याच्या व त्यांना सन्मानाचे जीवन देण्याच्या कार्यातच त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य व्यतीत केले

**डिप्रेस्ड क्लास मिशन**

अस्पृश्यतेबाबत महर्षी शिंदे म्हणतात, अस्पृश्यता ही पुरातन सामाजिक संस्था आहे. ती सर्व जगात आहे पण भारतातील तिचे खास वैशिष्ट्य म्हणजे येथील अस्पृश्यता वंशपरंपरा-गत आहे. त्या जातींनी वेगळया ठिकाणी रहावे व हा नियम कोणी मोडला तर त्यावर बहिष्कार टाकावा. 'अस्पृश्यता केवळ स्थानिक अथवा धार्मिक नसून ती जातीय आणि नित्य स्वरूपाची आहे.' अशा अस्पृश्यतेच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी महर्षी शिंदे यांनी १८ ऑक्टोबर १९०६ रोजी मुंबई येथे 'डिप्रेस्ड क्लास मिशन'ची स्थापना केली.

**डिप्रेस्ड क्लास मिशन स्थापनेचे उद्देश**

१) अस्पृश्य समाजात शिक्षणाचा प्रसार करणे. त्यांच्यासाठी शाळा, दवाखाने, उद्योगशाळा, वसतिगृहे काढणे. समाजाचे परिवर्तन करणे. २) अस्पृश्यता निवारणासाठी समाजाचा पाठिंबा घेणे. ३) अस्पृश्यांना नोकरीच्या संधी मिळवून देणे. ४) अस्पृश्यांच्या अडीअडचणींचे निवारण करणे. ५) सार्वजनिक धर्माची शिकवण देणे. या उद्देशाने अनुसरून त्यांनी या संस्थेच्या माध्यमातून भरीव कार्य केले

**डिप्रेस्ड क्लास मिशनच्या शाखा व कार्य**

कर्नाटकात हुबळी, बेळगाव, विजापूर व गोकाक येथे मिशनच्या शाखा होत्या. अन्यत्र पुणे, मंगलोर, इंदोर, भवानी, मनमाड, इगतपुरी, अकोला, अमरावती, दापोली, नाशिक व महाबळेश्वर या ठिकाणी ही मिशनच्या

शाखा होत्या. मिशनच्या कामाची सुरुवात शिंदे यांच्या घरापासून झाली. त्यांची बहीण जनक्का या पनवेल येथे मुलींच्या शाळेत मुख्याध्यापिका होत्या. नोकरी सोडून त्यांनी मिशनचे कार्य सुरू केले.

**अस्पृश्य मुलांसाठी शाळा व वसतिगृहे उघडली**

डिप्रेस्ड क्लासेस मिशनने अनेक शाळा व वसतिगृहे सुरू केली. मुंबई येथील एल्फिन्स्टन रोड येथे डिप्रेस्ड क्लासेसची पहिली शाळा स्थापन करण्यात आली. यवतमाळ येथे अस्पृश्यांसाठी एक वसतिगृह काढले. मुंबई शाखेने ४ शाळा काढल्या. पुणे येथे मिशनच्या १४ ठिकाणी २३ शाळा, ५ वसतिगृहे व १२ इतर संस्था होत्या. मिशनमध्ये ५ प्रचारक होते व शाळेत ५५ शिक्षक होते. पुणे नगर परिषदेने १ एकर जागा मिशनला दिली. १९२२ साली येथे इमारत बांधली. तिला 'अहिल्याश्रम' असे नाव देण्यात आले.

**मिशनमार्फत अनेक लघुउद्योग सुरू केले**

महाबळेश्वर येथील शाखेत कात्याचे दोरखंड व वेताच्या टोपल्या विणण्याचे कार्य चालत असे. अस्पृश्य वस्तीत शिवणकामाचे वर्ग चालवले जात. सुतारकाम, चित्रकला, रंगकाम, पुस्तक बांधणी व कात्याच्या कामाचे व्यवसाय शिक्षण वर्ग सुरू केले.

**दुष्काळग्रस्तांना मदत व इतर सामाजिक कामे**

१९२० मध्ये पुणे व नगर जिल्हयात दुष्काळ पडलेला असताना मिशनच्यावतीने धान्य, शिजवलेले अन्न मोफत दिले. कपडे व पैशांच्या स्वरूपात दुष्काळग्रस्तांना मदत केली. तसेच मिशनने १९१० मध्ये मुरळी प्रतिबंधक सभा भरवली. १९१२ मध्ये अस्पृश्यता निवारण परिषद भरवली. प्रबोधनासाठी व्याख्याने किर्तने आयोजित केली. आजारी लोकांचीही सेवा केली. अस्पृश्य मुलांचे संगोपन केले.

डिप्रेस्ड क्लासेस मिशनचे नाव सर्वदूर पोहचायला लागले. संस्थेस मान, आदर प्राप्त झाला. पण काही मंडळींनी शिंदे यांच्यावर अनेक गलिच्छ आरोप केले. शेवटी कंटाळून १९२३ साली त्यांनी स्वतःला या कार्यातून मुक्त करून घेतले.

**वायकोम सत्याग्रह आणि पुणे पर्वती मंदिर प्रवेश सत्याग्रह**

विठ्ठल शिंदे हे ब्राम्ही समाजाचे आचार्य म्हणून दक्षिणेत गेले होते. त्यावेळी त्रावणकोर संस्थानात वायकोम येथे अस्पृश्य लोकांवर फार बंधने होती. मंदिरात जाण्यास तर बंदी होतीच पण मंदिराच्या जाण्यायेण्याच्या रस्त्यावर देखील अस्पृश्यांना फिरण्यास बंदी होती. हा अन्याय दूर करण्यासाठी वायकोम येथे सत्याग्रह करण्यात आला. शिंदे यांच्या या सत्याग्रहामुळे त्यांचे ब्राम्ही समाजाचे आचार्यपद काढून घेण्यात आले.

पुण्यातील पर्वती टेकडीवरील मंदिर, जे शतकानुशतके केवळ उच्च जातींसाठी खुले होते, ते दलितांना (अस्पृश्यांना) खुले करून देण्यासाठी 13 ऑक्टोबर 1930 रोजी सत्याग्रह सुरू करण्यात आला. हा सत्याग्रह प्रामुख्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली झाला असला तरी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी त्यामध्ये सक्रिय सहभाग घेतला.

**मुरळी प्रथेविरुध्द कार्य**

मूल होण्यासाठी खंडोबाला नवस करण्याची प्रथा समाजात होती. अशावेळी नवस केलेल्या जोडप्याला मूल झाल्यास ते पहिले मूल खंडोबाला वाहिले जात असे. (मुलास वाघ्या व मुलीस मुरळी म्हटले जात), कर्नाटकात सौदलीच्या देवीला मुरळी सोडण्याची परंपरा होती. मुरळी अर्थात देवदासीवर आयुष्यभर अन्याय व अत्याचार होत असत. विठ्ठल शिंदे यांची आजी यल्लमाची भक्त होती. त्यामुळे या सर्व बाबी त्यांनी जवळून पाहिल्या होत्या. म्हणून या अनिष्ट प्रथेला त्यांनी विरोध केला. २५ एप्रिल १९१० रोजी त्यांनी मुरळी प्रतिबंधक परिषद बोलवली. त्याही वेळी मुरळी करण्यासाठी घेऊन जात असलेल्या एका मुलीची त्यांनी सुटका केली. ही

प्रथा बंद करण्यासाठी कार्यकर्त्यांचा संघ उभारला. देवदासी प्रथेला प्रतिबंध करण्यासाठी वि. रा. शिंदे यांच्यासोबत शिवराम जनाबा कांबळे यांनी कार्य केले.

**स्त्रियांच्या शिक्षणाचा आग्रह**

१९१९ साली पुणे पालिकेने मुलांना सक्तीचे शिक्षण देण्याचा ठराव पास केला. यात मुलींचा देखील समावेश केला जावा आणि १४ वर्षांखालील सर्व मुला-मुलींना प्राथमिक शिक्षण सक्तीचे असावे व ते पालिकेने मोफत दयावे, यासाठी त्यांनी पुणे नगरपालिकेवर स्त्रियांचा मोठा मोर्चा नेला. रमाबाई रानडे व महर्षी शिंदे यांची बहीण जनक्का या मोर्चात सहभागी झाल्या होत्या.

**शेतकरी चळवळ व शेतकरी परिषदा**

इंग्रजकाळात  शेतकऱ्यांची दैनावस्था झाली होती. सावकार व सरकारी नोकर शेतकऱ्यांची पिळवणूक करत. शेतकरी अज्ञान दारिद्रयामुळे पिचला होता. शेतकऱ्याचे हे प्रश्न सोडविण्यासाठी कर्मवीर शिंदे यांनी कार्य केले. १९२६ ते १९२९ या काळात त्यांनी शेतकरी चळवळीत भाग घेत मोलाचे योगदान दिले. महाराष्ट्रात ठिकठिकाणी शेतकऱ्यां-च्या परिषदा घेऊन त्यांना संघटित केले. शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी पुणे, वाळवे, चांदवड व तेरदाळ या ठिकाणी शेतकरी परिषदा घेतल्या. बारगावच्या वाळवा तालुका शेतकरी परिषदेचे ते अध्यक्ष होते. सरकारने केलेल्या सारावाढीला त्यांनी विरोध केला.

**अनिष्ट रूढी व प्रथांना विरोध**

देवदासी, मुरळी या समाजात खोलवर रुजलेल्या प्रथांना त्यांनी विरोध केला. लोकांमध्ये असणारा धर्मभोळेपणा व अनिष्ट रुढी परंपरांचा नायनाट करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. पंढरपुरात अनाथ आश्रम उभारला. सर्वसामान्य लोकांमध्ये सुधारणा करण्याचा या आश्रमाने प्रयत्न केला. तसेच दारूचा व्यवसाय सरकारने बंद करावा, असा त्यांनी आग्रह धरला. त्यासाठी व्याख्याने दिली, निदर्शने केली.

**समारोप**

१९३५ पासून अनेक रोगांमुळे महर्षी शिंदे यांचे शरीर साथ देत नव्हते. त्यांना गोवर झाला होता. १९४३ साली त्यांना अर्धांगवायूचा झटका आला. आणि २ जानेवारी १९४४ रोजी त्यांचा मृत्यू झाला. अस्पृश्यांच्या कल्याणासाठी त्यांनी स्वतःला पूर्णपणे वाहून घेतले त्यांच्या या निष्काम कर्मयोगी वृत्तीमुळे आणि समाजसेवेतील ऋषींइतक्या उंचीच्या कार्यामुळे भारतीय जनतेने त्यांना 'महर्षी' व 'कर्मवीर' या पदव्या देऊन गौरविले. दामोदर नारायण पटवर्धन यांनी महर्षी शिंदे यांना 'अस्पृश्यता निवारकाचे गुरु' असे म्हटले आहे. "मानवतेची सेवा हाच खरा धर्म मानणाऱ्या महर्षी शिंदेंचा जीवनप्रवास आजही आपल्याला समतेची आणि सामाजिक न्यायाची प्रेरणा देतो."